ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## VOLUME - I ISSUE - III
## OCT. TO DEC. 2020

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

Principal
N.P.W. College
Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref No.
Dt.

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मानवतावाद | डॉ.मनोहर आंबटकर<br>डॉ. मिलिंद कांबळे | 1-5 |
| 2 | विमुक्त भटक्यांच्या चळवळीला दिशा देणारे आत्मकथन: 'कत्ती' | डॉ.मारोती कसाब | 6-9 |
| 3 | कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविता: एक आस्वाद | प्रा.डॉ.विनोद उत्तमराव भालेराव | 10-15 |
| 4 | संत साहित्यातील संतकवियित्री | प्रा. डॉ. सुनंदा घरडे | 16-21 |
| 5 | राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता'निर्मिती मागील भूमिका | डॉ. अविनाश श. घोबे | 22-25 |
| 6 | एकोणिसावे शतक : स्त्री व समाज | जागृती अरुण बधान | 26-29 |
| 7 | 'होळी' बंजारा समाजाचा सांस्कृतिक उत्सव | प्रा.डॉ.विनोद दे. राठोड | 30-33 |
| 8 | दलित आत्मकथनातील प्र.ई.सोनकांबळे यांचे समाजव्यवस्थेतील स्थान | प्रा.नामदेव शिनगारे | 34-37 |
| 9 | महाराष्ट्रातील दत्त संप्रदायकालीन सामाजिक स्थिती.गती : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.राजेंद्र सुखदेव चौधरी | 38-41 |
| 10 | आदिवासी नायकांचे स्वातंत्र्यासाठीचे योगदान | डॉ. विठ्ठल केदारी | 42-48 |
| 11 | भाषा आणि साहित्य : आंतरसंहितात्मक अभ्यास | डॉ.बालाजी घारुळे | 49-52 |
| 12 | गुलाममंडी उपन्यास में चित्रित पात्रों की समीक्षा | डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे | 53-55 |
| 13 | इक्कीसवी सदी का मीडिया | प्रा. डॉ. बायजा कोटुळे | 56-60 |
| 14 | निराला के काव्य में राष्ट्रीय चेतना | डॉ. संतोष रामचंद्र आडे | 61-64 |
| 15 | "अल्मा कबूतरी" उपन्यास में अभिव्यक्त भाषाशैली एवं उद्देश्य | प्रीती अहिर<br>डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे | 65-67 |
| 16 | कोरोना संकट में वैश्विक अर्थव्यवस्था और खेल उद्योग पर असर | डॉ.हेमंत वर्मा | 68-74 |
| 17 | आधुनिक हिंदी कहानियों में चित्रित वैवाहिक परिदृश्य | डॉ.ज्ञानेश्वर महाजन | 75-77 |
| 18 | सिनेमा और साहित्य | प्रा. डॉ. उत्तम जाधव | 78-80 |
| 19 | ओमप्रकाश वाल्मीकि की कविताओं में अभिव्यक्त आंबेडकरवादी चितन | प्रा.डॉ.रविंद्र आर. खरे | 81-86 |
| 20 | समकालीन दौर में साहित्य और सिनेमा की भूमिका | प्रोफेसर डॉ.आबासाहेब राठोड | 87-91 |
| 21 | महाराष्ट्रातील जलसिंचनातील असमोल : एक दृष्टिक्षेप | प्रा.रासकर भीष्मा रंगनाथ | 92-98 |
| 22 | भारताच्या नियोजन कालखंडातील शेतीचा विकास | डॉ. मुळे पी.एम. | 99-102 |
| 23 | धुळे जिल्ह्यातील धरणप्रभावित क्षेत्रांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास | संजय नामदेवराव तोरवणे<br>प्राचार्य. डॉ. डी. एस. पाटील | 103-106 |



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Dist. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani Dist. Bhandara
Ref No.
Dt.

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनाची प्रवृत्ती (कालखंड २००९-१० ते २०१८-१९) | प्रा.डॉ. वायसे शामराव भगवान | 107-113 |
| 25 | नोबेल पारितोषिक विजेते : डॉ.अभिजीत बॅनर्जी | डॉ.श्री.घेडे डी.आर. | 114-120 |
| 26 | मध्ययुगीन भारत : इतिहास साधन एक अभ्यास | डॉ.देवकाते बी.एन. | 121-125 |
| 27 | डॉ.महंमद इक्बाल:एक थोर भारतीय राजकीय विचारवंत | प्रा. डॉ. शहाजहान शेख | 126-128 |
| 28 | महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य | प्रा.डॉ. निलीमा राऊत | 129-134 |
| 29 | भारतीय क्रांतीकारकांच्याकार्याचे परिक्षण | प्रा.डॉ.प्रमिला डी. भोयर | 135-141 |
| 30 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन | प्रा.डॉ.निलीमा राऊत | 142-147 |
| 31 | मराठेकालीन वेटबिगारी | प्रा. शिंदे एच. ए. | 148-150 |
| 32 | पेशवेकालिन निवडक स्त्रिया व त्यांचे कार्य | प्रा.डॉ. नाथवर बी.डी. | 151-154 |
| 33 | आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या | डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे | 155-159 |
| 34 | वैश्वीकरण एवं लोक प्रिय संस्कृति - एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.दिलीप कुमार सोनी | 160-165 |
| 35 | हुंडा-एक सामाजिक समस्या | प्रा.डॉ.आर.डी.खताळ | 166-168 |
| 36 | नैतिक मूल्यांच्या ऱ्हासामुळे भारतीय कुटुंबव्यवस्था अडचणीत | डॉ.मारोती कोल्हे | 169-171 |
| 37 | पंचायत राज्य व्यवस्थेअंतर्गत महिलांचे सक्षमीकरण | डॉ.प्रा.अश्विनी अविनाश खापरे | 172-175 |
| 38 | भारतीय राजकारण : धर्मनिरपेक्षता | प्रा.डॉ.अर्जुन ढबाळे | 176-181 |
| 39 | अण्वस्त्र निर्मिती जगासमोरील समस्या | प्रा. डॉ. शिवाजी दिवान | 182-184 |
| 40 | महात्मा गांधीजीचा शिक्षण विषयक दृष्टिकोन | डॉ संजय गोपाळराव ठवळ | 185-190 |
| 41 | दक्षिण आशियातील राजकारण आणि सार्क संघटनेतील भारताची भूमिका | प्रा. डॉ. अरुण पेंटावार | 191-196 |
| 42 | ग्रामसभांचे ग्रामविकासातील योगदान | सा.प्रा.डॉ. सांगळे भगवान श्रीपत | 197-203 |
| 43 | शारीरिक शिक्षण व खेळांची आवश्यकता व महत्त्व | डॉ.तनपुरे विश्वंभर श्रीराम | 204-206 |


Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani, Dist. Bhandara

# भारतीय क्रांतीकारकांच्याकार्याचे परिक्षण

प्रा.डॉ.प्रमिला डी. भोयर,
(सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख
स्व.निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, लाखनी, जि.भंडारा–४४१८०४

**प्रस्तावना :**

सन १६०० मध्ये इंग्रज भारतात व्यापार करण्याच्या उद्देशाने आले. व्यापार करता करता भारताचे राजे बनले. 'व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले'. इंग्रज भारतात आले त्यावेळी दिल्लीच्या गादिवर जहॉंगीर हा मोगल बादशाहा राज्य करीत होता. त्याच्याकडून व्यापारी सवलती मिळवून भारतभर व्यापार करू लागले. कालांतराने व्यापाराच्या कारणावरून इंग्रज व बंगालचा शासक सिरोजउद्दोला यांच्यात सन १७५७ ला प्लासीची लढाई झाली. या लढाईत इंग्रजांना विजय मिळाला व त्यांची हिंमत वाढली. त्यानंतर त्यांनी १७६४ ला बॅक्सारचे युध्द केले तेही त्यांनी जिंकले. अशाप्रकारे १७५७ च्या प्लॅसीच्या लढाईनी इंग्रजानी आपले पाय भारतात रोवले व बॅक्सारच्या लढाईनी ते मजबूत केले. हळूहळू संपूर्ण भारत गिळकृत करून भारतीय जनतेवर अन्याय करू लागले म्हणून सर्व भारतीय एकत्र येवून इंग्रजांच्या विरोधात उभे राहीले. इंग्रजांनी भारत सोडून जावे असे सर्व भारतीयांना वाटत होते आणि त्यासाठी सर्व भारतीय कार्य करीत होते. परंतू कार्य करण्याची प्रणाली ही वेगवेगळी होती. त्यामुळे इंग्रजांना भारतातून हाकलून लावण्यासाठी तीन विचार प्रवाहाचे लोक आपल्याला दिसून येतात, ते म्हणजे (१) मवाळवादी (२) जहालवादी आणि (३) क्रांतीकारी सर्वांचा उद्देश एकच होता. फक्त कार्य करण्याची पध्दत वेगळी होती. इंग्रज हे दडपशाही धोरणाचा अवलंब करून भारतीय मवाळवादी जहालवादी विचारांना दाबून टाकत. त्यामुळे भारतात क्रांतीकारी विचाराचा एक तरूण नवीन वर्ग उदयाला आला आणि तो म्हणजे क्रांतीकारी वर्ग होय.

**काकोरी कांड (इ.स. ९ ऑगष्ट १९२५) :–**

लखनौ जवळील काकोरी या गावाजवळ सरकारी खजीना घेऊन जाणारी रेल्वे गाडी ९ ऑगष्ट १९२५ रोजी रात्रीच्या वेळी क्रांतीकारकांनी लुटली यादवारे क्रांतीकारकांना भरपूर पैसा प्राप्त झाला परंतू यातील जवळपास ४० क्रांतीकारक इंग्रजाच्या हाती लागले नंतर त्यांच्यावर खटला भरण्यात येवून काहींना जन्मठेप तर काहींना फाशीच्या शिक्षा देण्यात आल्या.

**सायमन कमिशन आणि लाला लजपतराय यांचा मृत्यु – नोव्हे. १९२८ :–**

भारतातील क्रांतीकारी आंदोलण आणि स्वराज्य पक्षाच्या कार्यामुळे, ब्रिटीश सरकार अतीशय अडचणीत आले होते. याशिवाय बहुसंख्ये भारतीय जनतेमध्ये ब्रिटीश विरोधी प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली होती. यामुळे, भारतीयांचा असंतोष कमी करण्याच्या दृष्टीने आणि भारतात काही सुधारणा करण्याच्या उद्देशाने ब्रिटीश सरकारणे इ.स. १९२७ मध्ये सायमन कमिशनची नियुक्ती केली परंतू या कमीशनमध्ये सर्व सदस्य इंग्रजच होते.



Late N.P.W. College Dist. Bhandara Ref No. Dt.
Off. Principal
Late N.P.W. College
Lakhani Dist. Bhandara

त्यामध्ये एकाही भारतीयाचा समावेश केला नव्हता.

त्यामुळे भारतात काही सुधारणा करण्याच्या दृष्टीने सायमण कमिशन भारतात आले परंतू त्यात एकही भारतीय नसल्याने भारतीयांना हा अपमान वाटला आणि या कमिशन पासून आपल्याला काहीच फायदा मिळणार नाही याची जाणीव भारतीयांना झाली त्यामुळे या सायमण कमिशनला विरोध करण्याचे भारतातील प्रमुख नेत्यांनी ठरविले. त्यामुळे जेथे–जेथे हे कमिशन गेलेत तेथे या कमिशनच्या विरोधी अतीशय उग्र स्वरूपाची निदर्शने करण्यात आली.

पंजाबमध्ये सुध्दा सायमण कमिशनच्या विरोधी सन १९२८ मध्ये एक मोर्चा निघाला असतांना त्या मोर्चाचे नेतृत्व लाला लजपतराय करीत होते. परंतू या मोर्चावर इंग्रजांनी लाठीमार केल्यामुळे त्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्या प्रसंगी जमलेल्या जनसमुदायासमोर शेवटचे भाषण देतांना लाला लजपतराय म्हणतात, "माझ्या छातीवर बसलेले हे लाठीचे प्रहार म्हणजे इंग्रजी राज्याच्या दफणपेटीवर ठोकले जाणारे शेवटचे खिळे ठरेल." त्यानंतर नोव्हें. १९२८ मध्ये लालाजीचा मृत्यु झाला.

लालाजीच्या मृत्युमुळे बहूतेक सर्व भारतात अतिशय तीव्र रोषाची आणि उग्र स्वरूपाची भावना भारतीय जनमाणसात निर्माण झाली. क्रांतीकारकांनी तर लालाजीच्या वधाचा बदला घेण्याची प्रतीज्ञासुध्दा घेतली त्यामध्ये भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तीन प्रमुख क्रांतीकारक यामध्ये अग्रेसर होते. त्यानंतर या क्रांतीकारकांनी "सोसॉलीस्ट रिपब्लीक आर्मी" नावाची एक गुप्त क्रांतीकारी संघटना स्थापन केली आणि त्या माध्यमातून इंग्रज अधिकाऱ्याचे हत्याकांड करण्यास सुरूवात केली.

एप्रिल १९२९ रोजी भगतसिंगाने दिल्ली येथील केंद्रीय असेब्लीवर एक बॉब फेकला त्यामुळे संपूर्ण दिल्लीभर भितीयुक्त वातावरण निर्माण झाले परंतू नंतर भगतसिंगने स्वतःला अटक करवून घेतली आणि त्यानंतर भगत सिंगला कोर्टात उभे करण्यात आले त्यावेळी भगतसिंगाने भारतीय क्रांतीकारांची या चळवळी उभारण्यामागे काय भुमीका आहे हे स्पष्ट केले. भगतसिंग म्हणतात, "क्रांती म्हणजे रक्तपात नव्हे आणि व्यक्तीगत बदल्याची भावना सुध्दा नव्हे, क्रांती म्हणजे बॉब आणि पिस्तुलाचा धर्म नव्हे, तर आमच्या मते क्रांती म्हणजे वर्तमान वस्तुस्थिती आणि समाजव्यवस्था जी अन्यायावर आधारित आहे ती बदलली पाहीजे आणि अशा उच्च आदर्शासाठी आम्ही क्रांतीकारी चळवळी उभारूण स्वातंष्यासाठी स्वतःचे बलीदान देत आहोत.

त्यानंतर इ.स. १९३१ मध्ये भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन्ही भारतीय क्रांतीकारकांना फाशी देण्यात आली. याच दरम्यान गांधी इर्विन करार घडून आला. परंतू गांधीजींनी या क्रांतीकारकांच्या सुटकेसाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे पुन्हः भारतातील वातावरण अतीशय तंग बनले होते.

**चंद्रशेखर आझाद (१९३१) :–**

भगतसिंगच्याच गटातील चंद्रशेखर आझाद हे एक प्रमुख नेता होते. इ.स. १९३१ मध्ये चंद्रशेखर आझाद यशपाल आणि सुरेंद्र पांडे हे तीघेही अदला बदल पोहचले आणि रशियाच्या मदतीने भारताच्या स्वांतष्यासाठी सशस्त्र कारवाई करावी असे चंद्रशेखराचे मत



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N.P.W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref. No.
Dt.

होते याच दरम्यान अलाहाबाद मधील आल्फ्रेड पार्क मध्ये चंद्रशेखर आझाद आणि त्यांचे इतर साथीदार यांच्यात क्रांती विषयीची अतीशय गंभीर चर्चा सुरू असतांना अचानक त्या पार्कमध्ये इंग्रज़ पोलीस दाखल झालेत.

त्यानंतर इंग्रज पोलीसांनी गोळीबार करण्यास सुरूवात केली चंद्रशेखर आझादने सुध्दा इंग्रज पोलीसांना प्रतीकार केला परंतू शेवटी टिकाव न लागल्यामुळे चंद्रशेखरानी शेवटची गोळी स्वत:वर झाडली आणि त्यामध्ये त्यांचा अंत घडून आला.

**आझादहिंद फौज आणि सुभाषचंद्र बोस :—**

भारतातील क्रांतीकारी चळवळीचा नंतरचा काळ सुभाषचंद्र बोस आणि त्याच्या आझाद हिंद सेनेपासून सुरू होतो. सुभाषचंद्र बोस हे बंगालमधील जहाल विचारसरणीचे एक थोर क्रांतीकारक होते. इ.स. १९२० मध्ये त्यांनी भारतीय राजकारणात प्रवेश केला यावेळी कॉंग्रेसवर गांधीजीचे वर्चस्व होते परंतू गांधीजींची विचारसरणी सुभाषचंद्र बोसाना पसंत नव्हती त्यामुळे त्यांनी सुरूवातीपासूनच भारताच्या स्वातंत्र्यासाठी इतर काही तरूण वर्गामध्ये आपल्या विचारांचा प्रसार करण्यास सुरूवात केली.

वास्तविक पाहता इ.स. १९३८ मध्ये सुभाषचंद्र बोस कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. परंतू गांधीजीसी न पटल्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. याचवेळी जगात दुसरे महायुध्द सुरू होते. आणि इंग्लंडने त्यात उडी घेतली होती. त्यामुळे इंग्लंडच्या अडचणीचा फायदा घेवुन प्रखर आंदोलण उभारावावे असे बोसांना वाटत होते. परंतू त्यांना भारतातून विशेष सहकार्य न मिळाल्यामुळे परकीय देशांच्या मदतीने आपण ब्रिटीश सरकारला प्रतीकार करावा असे त्यांना वाटले त्यामुळेच सुभाषचंद्र बोस जाने. १९४१ मध्ये जर्मनीला पोहचले आणि हिटलरची भेट घेतली. मुळातच हिटलर इंग्लंडचा शत्रु असल्याणे त्यांनी सुभाषचंद्र बोसांना मदतीचे आश्वासन दिले त्यानंतर बोसांनी दुसऱ्या महायुध्द काळातील इटली आणि जर्मनीच्या ताब्यातील भारतीय सैनिकांची एक मुक्तीसेना तयार केली.

याचदरम्यान जपानमध्ये स्थाईक झालेले भारतीय क्रांतीकारक रासबिहारी बोसांचे सुभाषचंद्र बोसांना जपानला येण्याचे निमंत्रण मिळाले. त्यानंतर सुभाषचंद्र बोस जपानला गेले त्यापूर्वीच रासबिहारी बोसानी आझाद हिंद सेनेची पार्श्वभुमी तयार करूण ठेवली होती. नंतर सुभाषचंद्र बोसानी त्या लष्करी दलाची नव्याने पूर्नरचना करूण लढण्यासाठी सज्ज अशा आझाद हिंद सेनेची स्थापना केली. त्यानंतर सुभाषचंद्र बोसानी जपानच्या मददतीने प्रत्यक्ष भारतावर आक्रमण करण्यापूर्वी आझाद हिंद सैनिकामध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी एक प्रेरणादायक भाषण दिले त्यावेळी — सुभाषचंद्र बोस म्हणतात, ''आमची मायभुमी स्वातंत्र्यासाठी भुकी आहे, तुम्ही मला रक्त दया, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो.'' आणि हिच आमच्या मायभूमीची इच्छा आहे.

त्यानंतर इ.स. १९४४ मध्ये सुभाषचंद्र बोसानी जपानच्या मददतीने भारताच्या पुर्वेकडील इंग्रजांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशावर आक्रमण करण्यास सुरवात केली. काही प्रदेश सुध्दा आझाद हिंद सेनेने जिंकला. आझाद हिंद सेनेची भारताच्या दिशेने यशस्वी वाटचाल चालू असतांनाच इ.स. १९४१ मध्ये जपान आणि जर्मनीने शरणागती पत्करली त्यामुळे जपानी अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करण्याच्या निमित्याने सुभाषचंद्र बोस परत टोकीयोला जात



Off. Principal
Late. N.P.W. College
Late N.P.W. College, Lakhani Dist. Bhandara
Ref. No.
Dt.

असतांना ऑगस्ट १९४५ मध्ये त्यांचा विमान अपघातात मृत्यु झाला. त्यानंतर आझाद सेनेला अपयश प्राप्त होऊण ब्रिटीश सकराणे त्या सर्वांना पडकून त्यांच्यावर कठोर का केली. आझाद हिंद सेनेवर होणाऱ्या कठोर कारवाईमुळे भारतीय जनतेत प्रचंड असंतो भावना निर्माण झाली. आणि त्याचीच परिणीती म्हणजे नाविक आणि वायुसेनेतील वि होय.

**नाविक आणि वायुसेनेतील विद्रोह (१९४६) :—**

पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात इंग्रजांनी भारतीय सैनिकांना आपल्या हितासाठी साम्राज्य रक्षणासाठी वापरले हाते. परंतू भारतीय सैनिकांना काही हक्क किंवा स्वा देण्याची इंग्रजांची तयारी नव्हती याच दरम्यान ब्रिटीश सरकारणे आझाद हिंद सैनि कठोर कारवाई करण्यास सुरूवात केली. यामुळे भारतातील नाविक आणि वायुसेनेती सैनिकामध्ये इंग्रजाविषयी प्रचंड असंतोष निर्माण झाला त्यामुळेच त्यांनी इ.स. १९४६ म ब्रिटीश सरकारच्या विरोधात विद्रोह करण्यास सुरूवात केली.

इंग्रजानी भारतीय सैनिकांचा विद्रोह मोडून काढला परंतू त्यांच्या लक्षात एक आली की, भारतातील सर्वसामान्य जनतेप्रमाणेच ज्यांच्या भरोषावर आपण राज्य करत त्या भारतीय सैनिकामध्ये सुध्दा स्वातंष्याची ज्वाला भडकली आहे. त्यामुळे आपल्या जास्त काळ भारताला गुलामीत ठेवता येणार नाही. अशी तीव्र जाणीव इंग्रजांना झाली आ त्यामुळेच तत्कालीन ब्रिटनचा प्रधानमंत्री ॲटली ने भारत स्वातंष्याची घोषणा केली.

**क्रांतीकारी आंदोलनाच्या अपयशाची कारणे :—**

भारताच्या स्वातंष्यासाठी उभारल्या गेलेल्या क्रांतीकारी चळवळींना अपयश प्राप्त झाले किंवा त्यांचा भारतात स्थाई प्रभाव पडू शकला नाही. भारतातील क्रांतीकारी आंदोलणाच्या अपयशाला जी प्रमुख कारणे वा परिस्थिती कारणीभूत ठरली त्याचा आढावा येणेप्रमाणे-

**१) केंद्रीय संघटनेचा अभाव :—**

भारतीय क्रांतीकारी आंदोलणामध्ये संपूर्ण भारत व्यापेल अशी एखादी केंद्रीय संघटना या आंदोलनामध्ये नव्हती. वेगवेगळ्या प्रांतातील क्रांतीकारक गुप्त संघटना स्थापन करूण ब्रिटीश सरकारला एकाच वेळी प्रतीकार न करता वेगवेगळ्या वेळी प्रतीकार करीत असत. त्यामुळे क्रांतीकारी चळवळीमधील शक्ती प्रतीकार यामुळे विभागला जात असे त्यामुळे क्रांतीकारी चळवळींवर नियंत्रण ठेवणे ब्रिटीशांना शक्य झाले.

समजा क्रांतीकारकांनी एकखादी केंद्रीय संघटना स्थापन करूण या संघटनेच्या मा यमातून एकाच वेळी ब्रिटीश सरकारला प्रतीकार केला असता तर, परीणाम वेगळा झाला असता, परंतू दुर्दैवाने क्रांतीकारकांनी याकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांना अपयश प्राप्त झाले.

**२) सर्वसामान्य जनतेचा पाठींबा नाही :—**

क्रातीकारी आंदोलण उभारण्यामागे क्रांतीकारकांचे उद्‌दीष्ट अतिशय चांगले असले तरी हे आंदोलण हिंसेच्या आधारावर चालणारे असल्यामुळे भारतातील सर्वसामान्य जनतेम ये हे आंदोलण लोकप्रीय होऊ शकले नाही. फक्त काही सुशिक्षीत मध्यम वर्गानीच या क्रांतीकारी चळवळीचे नेतृत्व केलेत. परंतू सर्वसामान्य जनतेच्या पाठींब्याशिवाय कोणतेही आंदोलण यशस्वी ठरू शकत नाही. त्यामुळेच भारतीय क्रांतीकारकांना भारतातील सर्वसामान्य



Off. Principal
Late N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Ref No.
Dt.
Late N.P.W. College Lakhani Distt. Bhandara

नतेचा पाठींबा न मिळाल्यामुळे त्यांना अपयश येणे स्वाभावीक होते.

) भारतातील प्रमुख नेत्याचे सहकार्य नाही :—

भारतीय क्रांतीकारी चळवळींना तत्कालीन भारतातील प्रमुख नेत्यांनी सहकार्य केले नाही किंवा क्रांतीकारी आंदोलणामध्ये सहभागी सुध्दा झाले नाही. भारतीय क्रांतीकारकांना या त्यांनी सहकार्य तर सोडाच साधी सहानुभूती सुध्दा दाखविली नाही. उलट सुरेंद्रनाथ बॅनर्जी सारखे नेते या क्रांतीकारकांच्या विरोधी कठोर कारवाई करावी अशा प्रकारचे प्रतीपादन ब्रिटीश सरकारला करीत होते. त्यामुळेच क्रांतीकारकांना अपयश प्राप्त झाले.

भारतातील या प्रमुख राजकीय नेत्यांनी क्रांतीकारी चळवळींना सहकार्य केले असते तर कदाचित परिणाम वेगळा झाला असता.

) ब्रिटीश सरकारची दडपशाही :—

क्रांतीकारी आंदोलनाच्या अपयशाचे प्रमुख कारण म्हणजे ब्रिटीश सरकारची कठोर दडपशाही निती हे होय. भारतातील बऱ्याच क्रांतीकारकांना ब्रिटीश सरकारणे पकडून काहींना फाशी तर काहींना जन्मठेप तर काहींना हद्दपार अशाप्रकारच्या कठोर शिक्षा देवून क्रांतीकारी आंदोलण दडपण्याचा प्रयत्न केला. याशिवाय वर्तमानपत्रावर बंदी सभा मोर्चे यावरसुध्दा ब्रिटीश सरकारणे बंदी आणली. ब्रिटीशसरकारच्या कठोर दडपशाही धोरणामुळे नंतरच्या काळात क्रांतीकारकांना इतर भारतीय तरूणाचे सहकार्य मिळाले नाही. एवढेच नव्हे तर ते या चळवळीत सहभागी झाले होते तेही ब्रिटीश सरकारच्या दडपशाही नितीमूळे चळवळीपासून दूर जावू लागेल त्यामुळेच क्रांतीकारकांना अपयश प्राप्त झाले.

) शस्त्राचा अभाव :—

भारतीय क्रांतीकारकांमध्ये शिस्तबध्दता, उत्साहीपणा आणि बलीदानाची प्रवृत्ती असली तरी हे आंदोलण शस्त्रावर फारमोठया प्रमाणात आधारीत होते परंतू क्रांतीकारकाजवळ त्या तुलनेत जी भारी शस्त्रे होती ती अतिशय कमी होती. बलाढय अशा ब्रिटीश सत्तेला टक्कर देण्यासाठी क्रांतीकारकाजवळ असलेली शस्त्रे फारच कमी असल्यामुळे क्रांतीकारी आंदोलणाला अपयश प्राप्त झाले. ब्रिटीशांची बरोबरी करण्याईतपत शस्त्राचा साठा जर क्रांतीकारकाजवळ राहला असता तर कदाचीत परिणाम वेगळा झाला असता.

) म.गांधीचा भारतीय राजकारणात प्रवेश :—

इ.स. १९२० च्या दरम्यान भारतीय राजकारणात म.गांधीजीच्या उदयामुळे भारतातील क्रांतीकारी आंदोलणाला पायबंद बसला असे म्हटले जाते. गांधीजीचा क्रांतीकारी चळवळीना अतिशय विरोध होता. त्यामुळेच भारतीय राजकारणात प्रवेश केल्यानंतर भारताच्या स्वातंत्र्यासाठी गांधीनी अहिंसा तत्वाचा अवलंब केला आणि त्याच माध्यमातून अनेक चळवळी उभारण्यास सुरूवात केली. मुळातच क्रांतीकारी चळवळी पेक्षा गांधीजीच्या अहिंसावादी चळवळी विशेष फायदायक नसल्यामुळे बहूसंख्य भारतीय जनतेनी गांधीजीना पाठींबा व्यक्त केला. त्यामुळेच क्रांतीकारकांना अपयश प्राप्त झाले इ. प्रमुख क्रांतीकारी चळवळीचा अपयशाला कारणीभूत ठरलीत.

निरीक्षण :—

आंधुनिक भारताच्या आणि भारतीय स्वातंत्र्याच्या इतीहासात क्रांतीकारी चळवळींना



Off. Principal
N.P.W. College
Dist. Bhandara
Late N. P. W. College, Lakhani
Ref. No.
Dt.

अतिशय महत्वाचे स्थान आहे. क्रांतीकारकांच्या कार्यावरून आपल्याला योगदानाची येवू शकते. तत्कालीन राष्ट्रवाद भारतीय असंतोष आर्थिक आणि नैसर्गिक संकट राजकीय दहशत इ. परिस्थितीमुळे भारताच्या स्वातंत्र्यलढयात क्रांतीकारी चळवळीचा झाला.

परंतू भारतीय क्रांतीकारकांना इंग्रजानी खुणी, डाकू, अतिरेखी अशा प्रकारच्या लावू भारतीय क्रांतीकारकाच्या कार्याचा इंग्रजांनी निषेध केला आहे. ब्रिटीशांच्या टिका काही अशी सत्यता असली तरी ते पूर्णरूपाने खरे वाटत नाही कारण की ब्रिटीशांनी आपली सत्ता टिकविण्यासाठी प्रसंगी हिंसेच्या मार्गाचा सुध्दा अवलंब केला आहे. त्याच आधारावर सनदशिर मार्गाने भारताला स्वातंत्र मिळणे अतीशय कठीण आहे. जाणीव काही भारतीय तज्ञाना झाल्यामुळे त्यांनी हातामध्ये शस्त्र घेण्याचे ठरविले त्यातूनच भारताच्या स्वातंष्यासाठी क्रांतीकारी आंदोलणाला सुरूवात केली. ब्रिटीश विरोधी कोणी आपल्या हक्काविषयी जर त्यांनाच झुंज दिली तर ते इंग्रजांना आवडत तरी, क्रांतीकारकांनी सुध्दा ब्रिटीशांना हिंसेच्या मार्गाच्या आधारावर प्रतीकार करण्याचा प्र केला. त्यामुळेच ब्रिटीशांनी आपल्या मर्जीनूसार भारतीय क्रांतीकारकांना वेगवेगळया दिल्या आहे.

इंग्रजांनी भारतीय क्रांतीकारकांच्या कार्याचा निषेध केला असला तरी, त्यामध्ये वि असे काही वाटत नाही. कारण की इंग्रज हे परकीय होते परंतू भारतातील काही म पुढाऱ्यांनी भारतीय क्रांतीकारकांच्या कार्याचा निषेध केला आहे. एवढेच नव्हे तर भार क्रांतीकारकांची कार्य व्यवहारीक नसून अनैतीक होते असे म्हटले आहे. वास्तवीक पा भारताच्या स्वातंष्यासाठी क्रांतीकारकांनी जी भुमीका बजावली त्यावरून क्रांतीकारकाच कार्याविषयी कोणालाही शंखा व्यक्त करण्याचा अधिकार नाही. जहाल गटाला सु भारतीय क्रांतीकारकांचा मार्ग पसंत नव्हता. परंतू त्यांनी क्रांतीकारकांच्या कार्याचा निषेध के नाही. आपण जर आपली थोडी नजर जगाच्या इतीहासाकडे फेकली तर, बलशाली जुल सत्तेच्या पायाखाली भरडल्या जाणाऱ्या राष्ट्रात क्रांतीकारी चळवळीचा उदय झाल्याची उदा. आपल्याला दिसतील. आपल्या हक्कासाठी किंवा स्वातंष्यासाठी ज्यावेळी सनदशी विधायक मार्ग कुचकामी, निकामी ठरतात. त्यावेळी हिंसेच्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. फ्रान्स, इटली, रशिया इ. देशामध्ये अशा क्रांतीकारी चळवळीचा उदय होऊन त देशातील विचारवंतानी, नेत्यांनी, क्रांतीकारी चळवळीचे स्वागत करून समर्थन सुध्दा दि परंतू भारतात भारतीय क्रांतीकारकांना समर्थन तर दूरच साधी सहानुभूतीसुध्दा भारतीय नेत्यां दाखविली नाही. ही भारतीय इतिहासाची फार मोठी शोकांतिका समजली जाते.

राष्ट्रकार्यासाठी स्वतःच्या घरादाराचा व सुखी संसाराचा त्याग करूण स्वातंष्यलढया उडी घेतली आणि देशाच्या स्वातंष्यासाठी त्यांनी स्वतःचे बलीदान सुध्दा केले यामध्ये कि राष्ट्रभक्ती सामावलेली होती याची आपण कल्पना करू शकत नाही. आश्चर्याची गोष्ट अशी की, लंडन येथे कर्झन वायलीला गोळया मारल्या, बद्दल काही भारतीय ने मदनलाल धिंग्राला दोष देत होते तर काही इंग्रज उलट मदनलाल धिंग्रची प्रशंसा करीत होते



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N.P.W. ... Ref. No. ... Dt. ... Distt. Bhandara

एकंदरीत क्रांतीकारकाच्या कार्याचे जर आपण बारभाईने परिक्षण केले तर त्यांच्या कार्याचे महत्व आपल्याला समजू शकते. एका ब्रिटीश अधिकाऱ्याने असा हिंसक मार्ग हा पत्करला असे बारिद्र घोषांना विचारले असता त्यांनी दिलेल्या उत्तरावरून क्रांतीकारकांच्या योगदानाची कल्पना येते.

बारिद्र घोष म्हणतात, ''खुण, दरोडे आणि लुटमार यामुळे स्वातंत्र्य मिळेल असे आम्हाला मूळीच वाटत नाही. परंतू मातृभुमीच्या रक्षणासाठी स्वतःचे बलीदान देवून तशाप्रकारचा एक आदर्श आम्हाला जनतेपुढे निर्माण करावयाचा आहे. तसेच भारतीय जनतेचा रोष सरकीय सत्तेच्या लक्षात आणून त्या सत्तेचे लक्ष भारतीयांच्या स्वातंत्र्याकडे वेधने'' हाच आमचा प्रमुख उद्देश या चळवळी उभारण्यामागे होता.

वास्तविक पाहता बलशाली जुलमी सत्तेसी जशास तसे वागलयाशिवाय ती सत्ता नमत नाही असे म्हटले जाते. ॲनी बेझंटने भारतीय क्रांतीकारकांना ''वाट चुकलेले तरूण'' असे म्हटले आहे. एकंदरीत भारतीय क्रांतीकारकांना काही परिस्थीतीमुळे अपयश प्राप्त झाले असते तरी, स्वातंत्र्य आंदोलणातील त्यांचे महत्व नाकारता येत नाही. क्रांतीकारी चळवळी मुळेच काही प्रमाणात का होईना, भारतीय जनतेत उत्साह आणि राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. दुसऱ्या महायुध्द काळातील क्रांतीकारकाची भूमीका लक्षात घेता क्रांतीकारकांमूळेच शेवटी देशाला लवकर स्वातंत्र्य मिळाले. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. क्रांतीकारकांच्या कार्याबाबद बोलतांना डॉ.मुजूमदार म्हणतात, ''सशस्त्र उठाव हे क्रांतीकारकांचे साहस नसून ते केवळ एक साधन होते आणि तेही नाईलाजाने पत्करले होते. स्वातंत्र्य लढयातील भारतीय क्रांतीकारकांचे योगदान निश्चितच मौलीक स्वरूपाचे होते.'' असे म्हटले आहे.

## संदर्भ सूची :–

१) डॉ. आठल्ये वि.भा. – 'आधुनिक भारताचा इतिहास' सन १७६१ ते १९७१, संजय ठाकरे प्रकाशन, प्रथम आवृत्ती २००९.

२) डॉ.कोलारकर; श.गो. – 'आधुनिक भारत' (१७६ ते १९५०), श्री मंगेश प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती २००४

३) आचार्य धनंजय – 'भारताचा इतिहास' सन १७६१– १९७१, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती २००९.

४) डॉ.वैद्य सुमन आणि कोठेकर शांता – 'आधुनिक भारताचा इतिहास'सन१९२०–१९४७, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,चौदावी आवृत्ती जाने. २०१७

◆◆◆

Late N.P.W. College, Lakhani Dist. Bhandara
Ref No.
Dt.
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara